'A' Grade
NAAC Re-Accredited
(4 th Cycle)

।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगा

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University,Jalgaon



संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे कार्यालय

जा.क्र. कबचौउमवि7-अ/दुष्काळ ग्रस्त/3319/2026 दि.17/11/2026

प्रति,

१) मा.प्राचार्य /संचालक,
कबचौउमविशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालये, समाजकार्य महाविद्यालये /परिसंस्था ---

२) मा.संचालक/ विभाग प्रमुख,
शैक्षणिक प्रशाळा,कबचौउमवि,जळगाव.

विषय :- सन 2026 च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम काळ) लागू झालेल्या 305 दुष्काळग्रस्त तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ :- १) शासन निर्णय जा.क्र.ससं/जबिज/डिबीट/२०२६,दि.०१/१०/२०२६ चे पत्र.
२) जा.क्र.उशिस/शिष्य-२०२६-अवर्षण-परीक्षा शुल्क-२०२६-२७/ई/१३२१७१६, दि.३०/०९/२०२६ रोजीचे उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र
३) जा.क्र.ससं/उशि/जविज/डिबीटी/२०२६, ०१/१०/२०२६ उच्च शिक्षण जळगाव विभाग, जळगाव यांचेकडील पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या संदर्भाने विद्यापीठाने जा.क्र.कबचौउमवि/७-अ/दुष्काळ ग्रस्त/३०८४/२०२६, दि.१३/१०/२०२६ रोजीच्या पत्रासोबत वरील संदर्भिय शासन निर्णय व पत्र जोडण्यात आलेले असून कृपया अवलोकन करावे.

वरील विषयाच्या अनुषंगाने सदरचा विषय मा.व्यवस्थापन परिषदेच्या दि.06/11/2026 रोजीच्या सभेत सादर करण्यात आला असता, त्यावर ठराव क्र.तात.व्य.प.ए-222/2026, दि.06/11/2026 **ब** खालील प्रमाणे :-

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, संचालक, उच्चशिक्षण व सहसंचालक,उच्च शिक्षण यांचेकडून प्राप्त वेळोवेळी लेखी व तोंडी निर्देशानुसार दुष्काळग्रस्त परिस्थिती विचारात घेता विद्यापीठाकडे जमा झालेल्या परीक्षा शुल्का पैकी 50%रक्कम संबंधित प्रशाळा/परिसंस्था/ महाविद्यालयांमार्फत उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडील निर्देशानुसार पात्र विद्यार्थ्यांना परत करण्यात यावी, असे सर्वानुमते ठरले.

उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने विद्यापीठाकडे जमा झालेल्या परीक्षा शुल्का पैकी 50%रक्कम वित्त विभागाकडून महाविद्यालयांना पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या संदर्भात महाविद्यालयाच्या स्तरावर पात्र विद्यार्थ्याच्या याद्या तयार करुन त्यांचे बँक डिटेल घेवून ठेवण्यात यावेत. वरील संदर्भात पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी बाबत लवकरच सविस्तर SOP कळविण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,
सही/-
(प्रा.योगेश एन.पाटील)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
कबचौउमवि,जळगाव.